"A"
Re-accredited By
NAAC (2014)
With CGPA - 3.16

**SHIVAJI UNIVERSITY**, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX – (0231) 2609000, 2609089
FAX : 0091-0231-2691533, 2692333, 2693294

*शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र*
*दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९)*
*फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३, २६९२३३३, २६९३२९४.*
Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliationt1@unishivaji.ac.in

**जा.क्र. संलग्नता/टे.१/युजीके/** 151 **दिनांक :-** 21 FEB 2015

प्रति,
मा. प्राचार्य/ संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त शिक्षण संस्था

विषय :- महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्राध्यापक पदाच्या (स्टेज-५ एजीपी १००००) स्थाननिश्चितीसाठी मार्गदर्शक सूचनाबाबत,

संदर्भ :- जा.क्र. संलग्नता/टे.१/युजीके/७०२० दिनांक १९/१०/२०१३ चे या कार्यालयाचे पत्र.

महोदय/महोदया,

आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, सहाव्या वेतन आयोग तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाची दि. ३०/०६/२०१० ची अधिसूचनेतील तरतूदीनुसार महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्राध्यापक पदाच्या (स्टेज-५ एजीपी १००००) स्थाननिश्चितीसाठी मार्गदर्शक सूचना तयार करणेसाठी गठीत केलेल्या समितीच्या शिफारशींना विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. सोबत महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्राध्यापक पदाच्या (स्टेज-५ एजीपी १००००) स्थाननिश्चितीसाठी मार्गदर्शक सूचना जोडल्या आहेत. त्या सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्याव्यात तसेच त्यानुसार प्राध्यापक पदाच्या स्थाननिश्चितीसाठी आपल्या महाविद्यालयातील पात्र शिक्षकांचे प्रस्ताव पाठविण्यात यावेत.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,

सोबत :- वरीलप्रमाणे

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विद्यापीठ अनुदान आयोगाची दि. ३०/०६/२०१० ची अधिसूचना तसेच सहाव्या वेतन आयोगातील तरतूदीनुसार महाविद्यालयीन शिक्षकांच्या प्राध्यापक पदाच्या (स्टेज-५ एजीपी १००००) स्थाननिश्चितीसाठी मार्गदर्शक सूचना

**अ) महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक पदामधून पदोन्नतीने प्राध्यापक पद भरण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना**

१. शासनाने मंजूर केलेली प्राध्यापक (Professor) पदाची संख्या विचारात घेवून ही पदे महाविद्यालयातील विद्याशाखामध्ये कार्यरत असलेल्या सहयोगी प्राध्यापकांची (Associate Professor) सेवाजेष्ठता आधारभूत मानून वाटप करण्यात यावीत.
२. प्राध्यापक पदांचे वाटप करताना महाविद्यालयातील प्रत्येक विद्याशाखेस जास्तीत जास्त एकच पद देण्यात यावे.
३. प्राध्यापक पद एकच मंजूर झाले असेल तर सर्व विद्याशाखामधील प्राध्यापकांची सेवाजेष्ठता विचारात घेवून प्रत्येक विद्याशाखेतील पहिल्या सेवाजेष्ठ सहयोगी प्राध्यापकांचा प्राध्यापक पदासाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे. सदर प्रस्ताव सादर करताना जास्तीत जास्त तीन सेवाजेष्ठ प्राध्यापकांचे प्रस्ताव सादर करावे लागतील.
४. मंजूर झालेल्या प्राध्यापक पदाचे वाटप हे विद्याशाखेनिहाय चक्रीय पध्दतीने (Rotation) करण्यात यावे.
५. एकापेक्षा जास्त महाविद्यालये संचलित करणाऱ्या संस्थेच्या संदर्भात त्यांच्या सर्व महाविद्यालयांना मंजूर झालेली प्राध्यापक पदे एकत्रित (Pool) करण्यात यावीत. यासंदर्भात प्राध्यापक पदाचे वाटप करताना सहयोगी प्राध्यापकांची संस्थास्तरावरील सेवाजेष्ठता विचारात घ्यावी.
६. संस्थास्तरावरील सेवाजेष्ठतेनुसार ज्या सहयोगी प्राध्यापकांची प्राध्यापक म्हणून निवड होईल त्यांची ज्या महाविद्यालयात ते संबंधित पद रिक्त असेल, तिथे नियुक्ती करण्यात यावी.
७. भूगोल व गृहशास्त्र हे विषय जिथे विज्ञानशाखा नाही तिथे हे दोन्ही विषय सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतंर्गत समाविष्ठ करण्यात यावे. (सदरचा नियम अनेक महाविद्यालये संचलित करणाऱ्या संस्थाना लागू राहणार नाही.)
८. प्राध्यापक पद रिक्त झाल्यानंतर ज्या विद्याशाखेला प्राध्यापक पद मिळाले असेल ती विद्याशाखा सोडून उर्वरित विद्याशाखेतील सहयोगी प्राध्यापकांचेच प्रस्ताव सादर करण्यात यावेत.
९. विद्यापीठाच्या परिनियमात विहित केल्यानुसार विद्याशाखा राहतील.
१०. प्राध्यापक पदोन्नतीसाठी प्रस्ताव सादर करताना पद निर्माण/रिक्त झालेल्या दिनांकापूर्वीच्या मागील तीन वर्षाचे गुणरुपांतर तक्ता (Conversion Table)/ PBAS अहवाल सादर करावेत.
११. विद्यापीठ संकेतस्थळावर दि. २१/१०/२०१३ रोजी प्रसिध्द केलेल्या स्थाननिश्चितीसंदर्भातील मार्गदर्शक सूचना व तक्ता क्र. २ मधील प्राध्यापक पद स्टेज -५ साठीच्या सूचनांचेही अवलोकन करावे.

**ब) महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक पदामधून सरळसेवा भरतीने प्राध्यापक पद भरण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना**

१. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ३०/०६/२०१० ची अधिसूचना, त्यासंदर्भात मा. कुलगूरूंनी काढलेला दि. १८/०३/२०११ चा आदेश तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन आदेश यानुसार प्राध्यापक पदासाठी थेट भरती करावी.
२. प्राध्यापक पदासाठी थेट भरती करताना शासनाचे आरक्षणाचे आदेश व विद्यापीठाचे नियम लागू राहतील.

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,

कृपया मागे पहा....

## तक्ता क्रमांक २

### ६ व्या वेतन आयोगानुसार स्थाननिश्चिती

शासन निर्णय क्र. एनजीसी २००९/(२४३/०९)-युएनआय-१ दि. १२ ऑगस्ट, २००९ तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाची दि. ३०/०६/२०१० रोजीची अधिसूचना लागू करणारा शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०११/(२५/११) विशि-१ दि. १५ फेब्रुवारी, २०११ नुसार स्टेज २, स्टेज ३, स्टेज ४ व स्टेज ५ च्या स्थाननिश्चितीसाठी आवश्यक बाबी खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | बाबी (१) | स्टेज २ (रू. ७००० एजीपी) (२) | स्टेज ३ (रू. ८००० एजीपी) (३) | स्टेज ४ सहयोगी प्राध्यापक (रू. ९००० एजीपी) (४) | स्टेज ५ प्राध्यापक (रू. १०००० एजीपी) (५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सेवा कालावधी | ६ वर्षे सेवा कालावधी<br>१) पीएच. डी. संपादन केली असल्यास ४ वर्षे<br>२) एम.फिल./व्यावसायिक अभ्यासक्रमाची पदव्युत्तर पदवी संपादन केली असल्यास ५ वर्षे | स्टेज २ मधील ५ वर्षे सेवा किंवा वरिष्ठ श्रेणीतील ५ वर्षे सेवा | स्टेज ३ मधील ३ वर्षे सेवा किंवा निवड श्रेणीतील ३ वर्षे सेवा | स्टेज ४ मधील ३ वर्षे सेवा |
| २ | एपीआय गुण | १) कॅटेगरी १ व २ मिळून किमान गुण : १०० (प्रतिवर्षी)<br>२) कॅटेगरी ३ मध्ये किमान गुण : ५ (प्रतिवर्षी) | १) कॅटेगरी १ व २ मिळून किमान गुण : १०० (प्रतिवर्षी)<br>२) कॅटेगरी ३ मध्ये किमान गुण : १० (प्रतिवर्षी) | १) कॅटेगरी १ व २ मिळून किमान गुण : १०० (प्रतिवर्षी)<br>२) कॅटेगरी ३ मध्ये किमान गुण : १५ (प्रतिवर्षी) | १) कॅटेगरी १ व २ मिळून किमान गुण : १०० (प्रतिवर्षी)<br>२) कॅटेगरी ३ मध्ये किमान गुण : २० (प्रतिवर्षी) |
| ३ | उद्‌बोधन / उजळणी वर्ग अथवा प्रोग्राम | उद्‌बोधन वर्ग : १<br>उजळणी/ संशोधन पध्दती वर्ग : १<br>(२ ते ३ आठवडे कालावधीतील) | कोर्स / प्रोग्रॅम : १<br>(उजळणी वर्ग/ पध्दती कार्यशाळा/ प्रशिक्षण/ अध्यापन-अध्ययन मुल्यांकन तंत्रज्ञान कार्यक्रम/ शिक्षक विकास कार्यक्रम/ सॉफ्ट स्कील डेव्हलपमेंट प्रोग्रॅम यापैकी कोणताही कोर्स अथवा प्रोग्रॅम) (२ ते ३ आठवड्याचे) | कोर्स / प्रोग्रॅम : १<br>(स्टेज ३ मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही कोर्स अथवा प्रोग्रॅम : किमान एक आठवड्याचा) | निरंक |
| ४ | स्वयं मुल्यांकन अहवाल / गुण रूपांतर एपीआय तक्ता | १. सलग ६ वर्षे सेवाकालावधीतील अहवाल<br>२. एम. फिल. धारकांसाठी सलग ५ वर्षाचे अहवाल<br>३. पीएच. डी. धारकांसाठी सलग ४ वर्षाचे अहवाल | ५ वर्षाचे सर्व अहवाल | ३ वर्षाचे सर्व अहवाल | ३ वर्षाचे सर्व अहवाल |
| ५ | संशोधन प्रकाशने (Research Publications) | काही नाही | काही नाही | १) पीएच. डी. संपादन केली असल्यास : १<br>२) एम. फिल. संपादन केली असल्यास : २<br>३) पीएच. डी. /एम. फिल. नसल्यास : ३<br>i) संपूर्ण सेवा कालावधीमधील संशोधन प्रकाशने<br>ii) दि. ३० जून २०१० रोजी स्टेज २ म्हणजे वरिष्ठ श्रेणीमध्ये असलेल्या शिक्षकांना संशोधन प्रकाशनांच्याबाबत वर्षाच्या प्रमाणात सूट असेल. | संशोधन प्रकाशने (Research Publications) एकूण ५ (स्टेज ४ मधील कालावधीमधील आवश्यक) |

**सूचना - संशोधन प्रकाशनामध्ये एका पेक्षा जास्त लेखक (Author) असतील तर त्याचे मुल्यांकन ए.पी.आय. (A.P.I.) च्या निकषानुसार करण्यात येईल.**